दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ६८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.८ जून २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महाविकास आघाडीला अपक्षांचे बळ

## ट्रायडंटमधील शक्तिप्रदर्शनात १२ अपक्ष आमदारांची उपस्थिती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई : राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीनं सर्व आमदारांची बैठक मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये बोलावली आहे. महाविकास आघाडीनं २०१९ प्रमाणं शक्ती प्रदर्शन करण्याचा निर्णय घेतलाय. महाविकास आघाडी सर्व आमदार आणि मंत्री देखील या बैठकीला उपस्थित आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे निरीक्षक मल्लिकार्जून खर्गे आणि प्रभारी एच.के.पाटील उपस्थित आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह मविआचे नेते आमदारांना मार्गदर्शन करणार आहेत. महाविकास आघाडीसाठी दिलासादायक बाब म्हणजे अपक्ष आणि छोट्या पक्षांच्या १२ आमदारांनी या बैठकीला उपस्थिती दर्शवली आहे. गीता जैन, मंजुळा गावीत, आशिष जैस्वाल, देवेंद्र भुयार (स्वाभिमानी पक्ष), किशोर जोरगेवार, संजय शिंदे, नरेंद्र बोंडेकर, शामसुंदर शिंगे (शेकाप), विनोद अग्रवाल, चंद्रकांत पाटील, राजकुमार पटेल (प्रहार जनशक्ती पक्ष),विनोद निकोले (माकप) उपस्थित आहेत. महाविकास आघाडीला अपक्ष आमदारांचं मन वळवण्यात यश आल्याचं या निमित्तानं दिसून आलं आहे.

राज्यसभा निवडणुकीत १३ अपक्ष आमदार आणि छोट्या पक्षांचे १६ आमदार यांच्या भूमिकेवर निवडणुकीचा निकाल अवंलबून आहे. महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यासाठी २९ पैकी १२ आमदार आजच्या बैठकीसाठी उपस्थित आहेत. महाविकास आघाडीकडून अपक्ष आमदारांना मतदानासंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे, अशी माहिती आहे.

एऊ चं ठरलं, मलिक–देशमुखांच्या अर्जाला विरोध, कैद्यांना मतदानाचा अधिकार नसतो,

महाविकास आघाडी सरकारच्या स्थापनेवेळी २०१९ मध्ये ट्रायडंट हॉटेलमध्ये अशाच प्रकारचं शक्ती प्रदर्शन कण्यात आलं होतं. महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थित आमदारांना मार्गदर्शन करुन शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# बारावीचा निकाल आज जाहीर होणार

**दै.रायगड नगरी । पुणे**



बारावीच्या निकालाबाबत सोशल मीडियावर विविध दावे केले जात असतानाच आता बारा–वीचा निकाल पुढील आठवड्यात जाहीर होणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली होती. आता, उद्या म्हणजे बुधवार ८ जून रोजी दुपारी १ वाजता बारावीचा निकाल जाहीर होणार Maharashtra Board HSC Result Date 2022 Confirmed आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांना आता चांगलीच उत्सुकता लागली आहे. विद्यार्थ्यांना बोर्डाच्या वेबसाईटवर ऑनलाईन हा निकाल पाहता येईल.

कोरोना महामारीमुळे यंदा विद्यार्थ्यांनी घरातून शिक्षण घेतले. ऑनलाईन क्लासच्या उपस्थितीत गतवर्षी अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला होता. मात्र, बारावीच्या परीक्षा ऑफलाईन घेण्यात आल्या. त्यामुळे, यंदाच्या निकालाची विद्यार्थ्यांना अधिकची उत्सुकता आहे. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी व्हिडिओ ट्विट करुन बारावीच्या निकालासंदर्भात माहिती दिली आहे.

''महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च–एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार आज दि.८ जून,२०२२ रोजी दु.१:००वा. ऑनलाईन जाहीर होईल,'' असं ट्विट त्यांनी केलंय. विद्यार्थ्यांनी प्रथम महाराष्ट्र मंडळाच्या अधिकृत वेबसाइट www.mahahsscboard.in भेट द्यावी.

# किरकोळ वादातुन तरुणांनी चाकूने एकाला भोसकले ; 3 जण पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

उघड्यावर लघुशंका करू नये असे सांगणाऱ्या व्यक्तीचा राग मनात धरून त्याला मारहाण केल्यानंतर त्याला भाजी कापण्याच्या सुरीने भोसकल्याची गंभीर घटना रोहा तालुक्यातील कोलाड जवलील पुई गावात घडली असून या प्रकरणी कोलाड पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असून या बाबत अधिक तपास युद्ध पातळीवर सुरू आहे .

हाती आलेल्या माहिती नुसार या बाबत सविस्तर वृत्त असे कि सोमवार दि ६ जून रोजी कोलाड नजिक पुई गावाच्या हद्दीत कालव्यावर अंघोळीला आले होते.यातील काही तरुण उघड्यावर लघुशंखा करीत होते यावेळी फिर्यादी शंकर दिवेकर यांच्या घरातील महिला या अंगणात बसल्या होत्या त्यामुळे येथे लघुशंखा करू नका असे फिर्यादी यांनी सांगितले यावेळी तरुणांनी फिर्यादी याला शिवीगाळ केली.नंतर तरुणांना गावाबाहेर जाण्यासाठी सांगितले याचा राग मनात धरून आरोपीनी काही तरुण घेऊन सायंकाळी ७.३० सुमारास फिर्यादीच्या घरी आले व शिव्यागाळी करू लागले यावेळी फिर्यादीची सून रागिणी हिने त्यांना तेथून जाण्यास सांगितले.परंतु आरोपीपैकी दोघांनी रागिणीच्या गळयाला हाताचा विळखा घातला. सुनेला सोडविण्यासाठी फिर्यादी गेले असता त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीचे आत्माराम दिवेकर हे सोडविण्यासाठी गेले असता आरोपी प्रणय खाडे यांनी आत्माराम यांच्यावर डाव्या कुशीत सुरीने भोसकले यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात भादवी कलम ३२६, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रणय प्रदीप खाडे व करण रविंद्र गावडे दोघेही रा. गोवे फाटा शब्बीर शेठ बिल्डिंग ता. रोहा व प्रतिकेश भरत शिंदे रा.रासळ ता. सुधागड या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पाच ते सहा जणांचा पोलिस शोध घेत आहेत सदर गुन्ह्याप्रकरणी कोलाड पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक एस. ए. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक ए. एल.घायवट हे अधिक तपास करीत आहेत.

# सर्वांच्या सोबतीने अनेक कामे मार्गी : रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वांना सोबत घेऊन अनेक कामे मार्गी लागतात, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण येथे कार्यालयाच्या उद्घाटनावेळी केले. शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे कार्यालय गव्हाण येथे नव्याने बांधण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.



पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायतीसमोर शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे कार्यालय बांधण्यात आले आहे. या कार्यालयाच्या बांधकामासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून या नूतन कार्यालयाचा उद्घाटन सोहळा रविवारी मोठ्या उत्सा–हात झाला. या सोहळ्याला कामगार नेते महेंद्र घरत, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरूणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचयतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्या योगिता भगत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, न्हावा ग्रामपंचायतीचे

.../२

# राज्यात कोरोनाने पुन्हा वेग पकडला; नव्या व्हेरिएंटचाही रुग्ण आढळला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रात पुन्हा एकदा कोरोना संक्रमण वेगाने पसरत असल्याचं पुढे आले आहे. मागील २४ तासांत महाराष्ट्रात १८८१ कोविड रुग्ण आढळले. त्याचसोबत पुण्यात एका रुग्णाला इ–५ व्हेरिएंटची लागण झाल्याचं उघड झाल्याने खळबळ माजली आहे. एका महिलेमध्ये कोविडचा हा व्हेरिएंट आढळला आहे. कोविड रुग्णसंख्येत होणाऱ्या वाढीमुळे प्रशासन सतर्क झालं आहे. राज्यात सध्या सक्रीय रुग्णांची संख्या ८ हजार ४३२ इतकी झाली आहे.

राज्यात मागील २४ तांसात ८७८ रुग्णांनी कोरोनावर मात करून बरे झाले आहेत. राज्यात रिकव्हरी रेट ९८.०२ टक्के इतका आहे. तर कोविडमुळे मृतांची टक्केवारी १.८७ टक्के आहे. चिंतेची बाब म्हणजे राज्यात बीए ५ व्हेरिएंटचा रुग्ण आढळला आहे. पुण्यातील महिलेमध्ये हा व्हेरिएंट आढळला. बीजे मेडिकल कॉलेजनुसार, जीनोम सिक्वेसिंगच्या रिपोर्टमधून हा खुलासा झाला. त्यात पुण्यातील ३१ वर्षीय महिलेला बीए ५ व्हेरिएंटची लागण झाल्याचं समोर आले.

कोरोनाच्या मुळ विषाणुमध्ये उत्परिवर्तन होत असते. आपल्याकडे याआधी दुसरी लाट डेल्टा या विषाणुमुळे तर ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या प्रकारामुळे तिसरी लाट आली होती. यामध्ये

.../२

# मत्स्यव्यवसाय अधिकारी , मच्छीमार यांच्या परस्परांविरोधात पोलिसात तक्रारी

## मच्छीमारांचा लाच मागितल्याचा तर अधिकाऱ्यांचा शिवीगाळ, मारहाणीचा आरोप

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळी बंदीच्या आदेशानंतरही मासेमारी केल्याचा तसेच विचारणा केल्यावर शिवीगाळ, मारहाण केल्याच्या मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतर मच्छीमारांनीही परवाना अधिकाऱ्यांनी लाच न दिल्याने आकसापोटी नाहक खोटी तक्रार दाखल केल्याचा आरोप केला आहे. परस्परांविरोधात केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तपास, जाबजबाब नोंदविण्यास सुरुवात केली आहे.

शासनाच्या १ जुन २०२२ पासुन पावसाळी मासेमारी बंदीच्या आदेशानंतर उरण मत्स्य व्यवसाय अधिकारी सुरेश बागुलगावे यांनी ३ जुन २०२२ रोजी म्हणजेच अवघ्या दोन दिवसातच करंजा बंदरात खोल समुद्रात मासेमारी करून दाखल झालेल्या ' साई चिंतामणी ' मच्छीमार बोटीच्या मालकावर आदेश बंदीचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवून उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीत कारवाई करण्यासाठी गेलेल्या मत्स्य व्यवसाय अधिकारी व त्यांच्या अन्य सहकाऱ्यालाही शिवीगाळ, मारहाण केल्याच्या तक्रारीनंतर उरण पोलिसांनी बोट मालक महेंद्र नाखवा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र बोट मालक महेंद्र नाखवा यांनीही मत्स्य व्यवसाय अधिकारी सुरेश बागुलगावे यांच्या विरोधात उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.या तक्रारीत त्यांनी मत्स्य व्यवसाय अधिकाऱ्यांवरच लाचेची मागणी केल्याचा गंभीर आरोप करीत अनेक संशयास्पद मुद्दे उपस्थित केले आहेत.यामध्ये अधिकाऱ्यांनीच मच्छीमारांना शिवीगाळ करून खोट्या केसेसमध्ये अडकण्याची धमकी दिली असल्याचे म्हटले आहे.याप्रकरणी निपक्षपातीपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही मच्छीमारांनी केली आहे. परस्परांविरोधात दाखल झालेल्या तक्रारींचा तपास उरण पोलिस करीत आहेत.

## संक्षिप्त...

### सह्याद्री वाहिनीचे प्रसिद्ध वृत्तनिवेदक प्रदीप भिडे यांचे निधन



**दै.रायगड नगरी । मुंबई**

सुप्रसिध्द वृत्तनिवेदक आणि सूत्रसंचालक प्रदीप भिडे यांचे निधन झाले आहे. गेल्या ४२ वर्षांहून अधिक काळ त्यांनी सातच्या बातम्यांमधून प्रेक्षकांना राज्य–राष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडी सांगितल्या, ज्यांच्या भारदस्त आणि संवेदनशील आव–ाजातून बातमीची धग समजली, त्या सुप्रसिद्ध वृत्तनिवेदक प्रदीप भिडे यांचं निधन झालं आहे. वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दूरदर्शनमध्ये जवळपास ४२ वर्ष त्यांनी वृत्तनिवेदन केलं. भिडे यांनी राज्य आणि देशातील अनेक मोठ्या आणि महत्त्वाच्या घडामोडींवेळी केलेलं वृत्तनिवेदन आजही प्रेक्षकांच्या मनात कायम आहे. वयाच्या २१ व्या वर्षी भिडे यांनी पत्रकार म्हणून काम करायला सुरूवात केली.दूरदर्शनच्या वृत्तविभागामधे अनुवादक म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. सुरुवा–तीपासूनच मराठी वाङ्मय, नाटके, कादंब–या, एकांकिका या विषयांमधे त्यांना विशेष रूची होती.

# 'रयत'च्या सागर पाटील विद्यालयाला रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाखांचा धनादेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**



रयत शिक्षण संस्थेच्या ढवळी येथील राष्ट्रीय जलतरणपटू सागर पाटील विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ५० लाख रूपयांच्या मदतीचा धनादेश रयतचे चेअरमन अनिल पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी सोबत संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

दिवंगत एन. डी. पाटील यांचे नातू सागर पाटील यांच्या नावाने ही शाळा सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात ढवळी या एन. डी. पाटील यांच्या गावी उभारण्यात आली आहे. सागर पाटील यांनी वयाच्या पाचव्या वर्षांपासून उत्कृष्ट जलतरणपटू म्हणून नाव कमवायला सुरुवात केली होती. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देश–विदेशांतील स्पर्धांमधून सागर पाटील यांनी जलतरणपटू म्हणून नाव कमावले होते. स्वबळावर मिळालेल्या स्कॅालरशिपवर १२ वी नंतरचे शिक्षण घेण्यासाठी सागर पाटील हे लंडनला गेले, मात्र दुर्दे वाने त्यांना ब्लड कॅन्सर झाला. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

सागर पाटील यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या आणि परिसरात प्रथम क्रमांकावर असलेल्या याशाळेच्या मुख्याध्यापिका एन. डी. पाटील यांच्या पत्नी सरोज पाटील आहेत. या शाळेत कौशल्य आधारित वर्ग सुरू करण्यात येत आहेत. या वर्गात २५ वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या वर्गांसाठी एक कोटी रूपये खर्च आहे. त्यापैकी ५० लाख रूपयांचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेचे चेअरमन अनिल पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

> 'रयत'च्या शाळेसाठी रामशेठ ठाकूर यांनी वेळोवेळी मोठ्या मनाने मदत दिली आहे. या शाळेला तर त्यांनी यापूर्वीही मदत केली आहे. रामशेठ हे तर मला मुलासारखेच आहेत. त्यांची पत्नी शकुंतला, दोन्ही मुले आणिसुना या कायम आपुलकीने मदतीला तयार असतात.
>
> **-सरोज पाटील,**
> **मुख्याध्यापक, राष्ट्रीय जलतरणपटू सागर पाटील विद्यालय, वाळवा**

# तळा वाली रोहा रस्त्याची दुर्दशा ; सा.बां. रोहा विभाग निद्रीस्त

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा वाली रोहा रस्ता वाली पर्यंत चांगला असून वाली पासून खालची तांबडी पर्यंत अतीशय खराब झाल्याने वाहन चालकाला मोठी कसरत करावी लागत आहे. त्याबरोबर वळणाची झाडे झुडपे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वाढलेली तोडली नसल्याने संपूर्ण रस्त्यावर आली आहेत हि अपघाताला आमंत्रण ठरु शकतात. आता पुन्हा पावसाळ्यात झाडे झुडपे वाढू लागणार आहेत. त्यामुळे आपघाताची अधिक शक्यता निर्माण होणार आहे.

वाली ते तांबडी व वरची तांबडी ते वराठी रस्त्याची चाळण झाली आहे. उन्हाळ्यात एवढी परिस्थिती आहे तर पावसाळ्यात खड्ड्यात रस्ता कि रस्त्यात खड्डा अशी स्थिती निर्माण झाली आहे. या खड्ड्यातून मार्ग काढणे कसरत करावी लागत आहे. तसेच या संपूर्ण मार्गावर रस्त्यावर झाडे वाढली आहेत. वराठी ते खारी पर्यंत चा साईट पावसाळ्यात धुपून गेली आहे.फुटभर खोल पर्यंत गेल्याने समोरून येणाऱ्या वाहनांना साईट देणे मुश्किल होत आहे. या मार्गावर नेहमी अशी तर्हा होत असून या मार्गाने अनेक पर्यटक मुरूड श्रीवर्धन, हरीहरेश्वर या पर्यटनासाठी येत असतात या पर्यटकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अपघात घडले आहेत. सुखदरवाडी नदी पुलाला कठडेच नसल्याने काही महिन्यांपूर्वी युवकाचा बळी गेला होता. तरी त्वरीत कठडा बांधला गेलेला नाही. यापुढे अजून किती जणांचा बळी जाण्याची वाट बघत आहे. सां.बा. विभागाचे अधिकारी प्रवास करीत असूनही रस्त्याच्या दुरावस्था कडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप प्रवासी पर्यटकांकडून केला जात असून प्रशासनावर नाराजी केली जात आहे.



# मालमत्तेचे नुकसान व जीवितहानीसारखे गुन्हे वगळता शेतकरी आंदोलकांवरील इतर गुन्हे शासन मागे घेणार : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**



सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान आणि जीवितहानीसारखे गंभीर गुन्हे वगळता शेतकरी आंदोलनांतील शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदानाचे वाटप १ जुलै या कृषीदिनापासून करण्यात येणार आहे. कृषीमूल्य आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूकही लवकरच करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सांगितले.

पुणतांबा येथील शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील, कृषीमंत्री दादाजी भुसे, दुग्धव्यवसाय विकासमंत्री सुनील केदार, सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील, खासदार सदाशिवराव लोखंडे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये,महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, रोहयोचे अपर मुख्य सचिव नंद कुमार, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव

.../२

# संयमाचे धडे

आपल्याला ईश्वरभक्त म्हणविणारे सूफी संत मन्सूर अल्-हलाज यांना ईशनिंदा (ब्लाश्फेमी) केल्याबद्दल सन ९२२ मध्ये बगदादमध्ये मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली होती, अशा नोंदी आहेत. त्यांच्या आधी आणि नंतर आजपर्यंत जगातील विविध धर्मांच्या अनुयायांनी ईशनिंदेचा ठपका ठेवून हजारो प्राण घेतले असतील. तशा धमक्या आजही दिल्या जातात. कोणत्याही धर्मसमुदायाच्या भावना दुखावणे किंवा कोणालाही ईशनिंदा वाटेल, अशा स्वरूपाचे वक्तव्य करणे, हे किती प्रकारचे गंभीर परिणाम करू शकते, हे भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या नुपूर शर्मा आणि दिल्ली प्रदेश शाखेचे प्रवक्ते नवीन जिंदाल यांच्या निलंबनातून दिसू शकते. या निलंबनाने एव्हाना आंतरराष्ट्रीय बनलेला हा पेच सुटतो, की केंद्र सरकारला आणखी काही पावले टाकावी लागतात, हे येत्या काही दिवसांतच कळेल. नुपूर शर्मा आणि नवीन जिंदाल या दोघांनीही 'आपल्याला सतत धमक्या येत असून आपले प्राण धोक्यात आहेत,' असे म्हटले आहे. तेव्हा त्याही दृष्टीने कायद्याचे राज्य राखण्यासाठी आवश्यक ती पावले केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांना टाकावी लागतील. दरम्यान, याच वादातून कानपूरमध्येही हिंसाचार उसळला. त्यातील दोषींवर सध्या कारवाई होते आहे. उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू नेमके याच वेळेस पश्चिम आशियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनाही या वादाची झळ लागली आहे. करोनाचे कारण देऊन त्यांच्यासोबतचा शाही खाना कतारच्या राजघराण्याने रद्द केला. देशात समाजमाध्यमांमध्ये उग्र, हिंस्र आणि बेछूट वक्तव्यांना जोर चढला असून, त्यांच्यावर नियंत्रण कसे आणणार, हेही आव्हान आहे. देशात धर्माधर्मांमधील तेढ तातडीने कमी करणे आणि त्याच वेळी, जागतिक पातळीवर सुरू झालेला भारतविरोधी प्रचार रोखणे, असे दुहेरी आव्हान आज केंद्र सरकारसमोर आहे. नुपूर शर्मा आणि नवीन जिंदाल यांच्यावरील कारवाईकडे अशा व्यापक दृष्टीने पाहावे लागेल. यात केवळ धर्मभावनाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अर्थकारणाचेही अनेक पदर गुंतलेले आहेत. त्याच व्यापक दृष्टीने त्याकडे पाहायला हवे. वाहिन्यांवरील अधिकाधिक स्फोटक होणाऱ्या चर्चा टीआरपी वाढवत असल्या, तरी त्या देशाचे किती मोठे नुकसान करू शकतात, हे या निमित्ताने दिसते आहे. वाराणसीत ज्ञानवापी मंदिरात जे काही काम चालू आहे, त्याचे निष्कर्ष न्यायालयासमोर जावेत. त्यातून पुढे काय तो निकाल न्यायसंस्थेने द्यावा; मात्र या प्रकरणात दोन्ही बाजूंनी वातावरण गरम करण्यातच अनेकांना रस आहे. नेमक्या याच विषयावरील चर्चेत नुपूर शर्मा यांनी काही विधाने केली. त्यांनी ती नंतर मागेही घेतली; पण तोवर व्हायचे ते नुकसान झाले होते. जगातल्या कोणत्याही धर्माच्या प्रेषित, अवतार, देवता किंवा महापुरुषांबद्दल बोलताना किमान संयम आणि विवेक पाळला पाहिजे, याचा विवेक सगळ्यांनीच सोडल्याला बराच काळ झाला आहे. आपल्याला का राग आला, याची काही कारणमीमांसा नुपूर शर्मा यांनी देण्याचा प्रयत्न केला; मात्र हा बचाव ठरू शकत नाही. आखातामधील कतार, सौदी अरेबिया आदी देशांनी निषेध नोंदविलाच आहे. पाकिस्ताननेही ही संधी साधली. पाकिस्तानी परराष्ट्र मंत्र्यांनी एकदम चढा स्वर लावला. या विवादातून काळजीपूर्वक आणि राष्ट्रीय हिताचे नुकसान होऊ न देता बाहेर पडावे लागेल. जगभरात एक कोटी ८० लाख भारतीय राहतात. त्यातील सर्वाधिक आखाती देशांमध्ये आहेत. गेल्या तीन वर्षांत अनिवासी भारतीयांनी १९ लाख कोटी रुपये मायदेशी पाठवले आहेत. ही रक्कम अनेक देशांतर्गत उत्पन्नांपेक्षा जास्त आहे. सध्याच्या रशिया आणि युक्रेन यांच्या संघर्षकाळात भारताच्या तेलाच्या गरजेवर पडणारा ताण तर उघडच आहे. सुदैवाने, भारताचे सौदी अरेबियासकट सर्व आखाती देशांशी उत्तम संबंध आहे. इराणवर येणाऱ्या जागतिक दबावातही भारताने इराणला साथ दिली आहे. या संबंधांमध्ये कुठेही धर्म आला नाही. भारतात धार्मिक ताणतणाव वाढला आणि द्विपक्षीय नात्यांमध्ये धर्म डोकावू लागला, तर अनेकांना ते हवेच आहे. पाकिस्तानने ज्या वेगाने या वादात उडी घेतली, त्यावरून हे लक्षात यावे. अशा वेळी, समाजहित आणि राष्ट्रहित डोळ्यांपुढे ठेवून संयमाने वागणे व बोलणे आवश्यक असते. नुपूर शर्मा यांना आपण केंद्रातील सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्या आहोत, हा विवेक पाळता आला नाही. त्याची त्यांना शिक्षा होण्यापेक्षाही, देशाचे जागतिक मंचावर होणारे नुकसान किती तरी अधिक गंभीर आहे. या प्रकरणातून धडा घेऊन, सत्ताधारी पक्षातील वाचाळांनी स्वत:ला आवर घालावा. तसे न झाल्यास त्यात देशाचे नुकसान आहे. याच वेळी, जे हात तोडण्याची, मुंडकी उडविण्याची निर्गल भाषा करीत आहेत, त्यांनाही कायद्याच्या राज्याचा हिसका दाखवायला केंद्र व राज्य सरकारांनी मागेपुढे पाहू नये.

# सुपारीचा भाव वधारला ; पण उत्पादन घटल्याने बागायतदार चिंतेत

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेल्या तीन वर्षांत कोकणाला बसलेल्या दोन चक्रीवादळांनी यातील सुपारी पिकाच्या अस्तित्वावरच घाला घातला आहे. कोकणातील विशेषत: रायगड जिल्ह्यातील सुपारी बागा या चक्रीवादळांमुळे उद्ध्वस्त झाल्या आहेत. यामुळे यंदा या पिकाच्या एकूण उत्पादनावरही मोठा परिणाम झालेला दिसत आहे.

गेल्या तीन वर्षांत कोकणाला दोन चक्रीवादळांचा तडाखा बसला. या आपत्तीत सर्वाधिक हानी झाली ती कोकणातील सुपारी पिकाची. आधी निसर्ग आणि नंतर आलेल्या तौक्ते वादळाने सुपारी बागांचे मोठे नुकसान झाले. जवळपास साठ टक्के बागा या वादळांनी नष्ट केल्या. याचे घातक परिणाम आता दिसून यायला लागले आहेत. रायगड जिल्ह्यातील सुपारी उत्पादन निम्म्याहूनही कमी झाले आहे. एखाद्या आपत्तीतून एखादे पीकच धोक्यात येण्याचा हा प्रकार, प्रादेशिक शेती व्यवस्थेपुढे नवे प्रश्न निर्माण करणारा आहे. आपत्ती येतात आणि जातात. मात्र त्याचे परिणाम दीर्घकाळ भोगावे लागतात. याचा प्रत्यय रायगड जिल्ह्यातील सुपारी उत्पादकांना सध्या येत आहे. पाठोपाठ आलेल्या या दोन्ही चक्रीवादळांनी सुपारी उत्पादकांचे कंबरडेच मोडले आहे. ही वादळे येऊन गेल्यानंतर गेल्या तीन वर्षांत सुपारी उत्पादन निम्म्याहून कमी झाल्याचे दिसून येत आहे. यातून सावरण्यासाठी बागायतदारांना आणखी काही वर्षे प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात सुपारी लागवडीखालील क्षेत्र पाच हजार हेक्टरवर आहे. यातून दरवर्षी साधारणपणे ३५ ते ४० कोटींची उलाढाल होत असते. अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन तालुक्यातील किनारपट्टीवरील भागात प्रामुख्याने या सुपारीच्या बागा आहेत. भौगोलिकदृष्ट्या हा परिसर सुपारीसाठी अत्यंत पोषक वातावरण असलेला आहे, त्यामुळे येथे सुपारी लागवडीकडे बागायतदारांचा विशेष कल असतो. नगदी पिक म्हणूनही सुपारी पिकाकडे पाह्यले जाते.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धनची रोटा सुपारी ही प्रसिध्द आहे. या सुपारीत पांढरा भाग जास्त असतो. सुपारीत आरसेक्लोनीन या रसायनाचे प्रमाण कमी असते. इतर सुपाऱ्यांच्या तुलनेत ती चवीला जास्त चांगली असते. सुगंधी सुपारी आणि पान मसाला उत्पादनासाठी या सुपारीला जास्त मागणी असते. आखाती देश आणि अफगाणिस्तान, पाकिस्तान या देशात निर्यात केली जाते. श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्राने या सुपारीवर संशोधन करून नवीन प्रजाती विकसित केल्या आहेत. आज चौदा प्रकारच्या सुपारीच्या प्रजातींची कोकणात लागवड केली जाते. आंबा, काजू आणि नारळाच्या तुलनेत सुपारीची लागवड आणि संगोपन खर्च कमी आहे. यातून मिळणारे उत्पन्नही चांगले असते. त्यामुळे फायदेशीर फळपीक म्हणून याकडे बघितले जात आहे.

मात्र गेल्या २०२० च्या वर्षी जून महिन्यात आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने, तर २०२१ मधील तौक्ते वादळाने सुपारीचे पीक धोक्यात आणले आहे. श्रीवर्धन, मुरुड आणि अलिबाग येथील ६० टक्के सुपारीच्या बागा या चक्री वादळाच्या तडाख्याने भुईसपाट झाल्या. सुपारीची लाखो झाडे वादळात उन्मळून पडली. याचे गंभीर परिणाम पुढे भविष्यात आता सुपारी उत्पादनावर झाल्याचे दिसून येत आहेत.

सुपारी उत्पादक संघांच्या आकडेवारीनुसार श्रीवर्धन तालुक्यातील सुपारीचे वार्षिक उत्पादन १ लाख ३० हजार किलोवरून, ५० हजार किलोवर आले आहे. अलिबाग तालुक्यातील वार्षिक उत्पादन ४४ हजार किलोवरून ३३ हजार किलोवर आले आहे. तर मुरुड तालुक्यातील सुपारीचे वार्षिक उत्पादन १ लाख १६ हजार किलोवरून ४४ हजार ४८० किलोवर आले आहे. यावरून वादळामुळे जिल्ह्यातील सुपारी उत्पादनावर झालेल्या परिणामांची तीव्रता लक्षात येऊ शकते.

वादळाचा फटका हा तात्कालिक नव्हता. तो दूरगामी असल्याचे बागायतदार सांगतात. उद्ध्वस्त झालेल्या बागा नव्याने उभे करणे आव्हानात्मक आहे. रोपांची अनुपलब्धता ही त्यांच्या समोरील सर्वात मोठी समस्या आहे. सुपारीचे एक झाड उत्पादनक्षम होण्यासाठी किमान आठ ते दहा वर्षांचा कालावधी लागतो, त्यानंतर ते झाड वर्षांकाठी एक ते दीड हजाराचे उत्पन्न देण्यास सुरुवात करते. त्यामुळे वादळग्रस्त बागायतदारांनी आता जरी सुपारीची लागवड सुरू केली तरी, त्यांना प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यासाठी किमान दहा वर्षांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे सुपारी उत्पादन पूर्ववत होण्यासाठी बराच कालावधी जाणार असल्याचे दिवेआगर येथील सुपारी उत्पादक संघाचे सचिव सिध्देश शिलकर सांगतात.

निसर्ग वादळानंतर सुपारीची रोपे उपलब्ध करून दिली जातील, असे राज्यसरकारने जाहीर केले होते. मात्र ती अद्यापही आवश्यक तितक्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. रोपांची अनुपलब्धता ही बागायतदारांसमोरील सध्याची सर्वात मोठी समस्या असून, सुपारीची रोपे मिळावीत यासाठी कृषी विभागाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे मुरुड सुपारी उत्पादक संघाचे अध्यक्ष महेश भगत यांचे म्हणणे आहे. श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्रात वर्षभर रोप निर्मितीचे काम सुरू असते. मात्र या संशोधन केंद्रालाही वादळाचा तडाखा बसला. त्यामुळे सुपारी रोपांची कमतरता जाणवत आहे. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणात भूधारणेचे प्रमाण खूपच कमी आहे. येथील बहुतांश शेतकरी हा अत्यल्प आणि अल्प भूधारक आहे. अशावेळी कमीत कमी जागेत जादा उत्पादन देणारे पीक म्हणून बागायतदार सुपारीकडे वळला होता. पण वादळामुळे सुपारीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. वादळामुळे सुपारीच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे उत्पादन घटले आहे. पण आंतराराष्ट्रीय आणि राष्ट्रीय बाजारात श्रीवर्धनच्या रोटा सुपारीला असलेली मागणी कायम आहे. पण मागणीच्या तुलनेत पुरवठा होत नसल्याने सुपारीचा भाव वाढला आहे. गेल्या वर्षी सुपारीला प्रती मण ६४०० इतका तर या वर्षी त्यात १ हजार १२० रुपये एवढी वाढ होत ७ हजार ५२० रुपये इतका विक्रमी दर मिळाल्याचे मुरुड सुपारी संघाचे संचालक जगदीश पाटील यांनी सांगितले. यावर्षीही सुपारीला चांगला दर मिळण्याची आशा बागायतदारांना आहे. वादळानंतर राज्यसरकारने फळबाग लागवड आणि पुनरुज्जीवन लागवड योजना लागू केली आहे. जवळपास आठ हजार हेक्टरवर जिल्ह्यात ही योजना राबविली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक पूर्वतयारी कृषी विभागाने सुरू केली आहे. मात्र या योजनेसाठी अद्याप शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नाही. तो प्राप्त झाल्यावर लाभार्थी बागायतदारांना निधी वितरण सुरू केले जाणार आहे. जिल्ह्यात सुपारीच्या रोपांची कमतरता लक्षात घेऊन अलिबाग येथील आवास येथील रोपवाटिकेत ८० हजार रोपे तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मुरुड आणि अलिबाग येथील ८ बागायदारांना सुपारीची रोपं तयार करण्यास सांगण्यात आले आहे. जवळपास आठ लाख रोपे तयार करण्याचे उद्दिष्ट त्यांना देण्यात आले आहे. नंतर कृषी विभाग ही रोप खरेदी करून बागायम्तदारांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# जुईनगर गव्हाण फाटा मार्गे वेश्वी दिघोडे ते कोप्रोली बस सेवा चालू करण्यासाठी प्रस्ताव दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील विंधणे , दिघोडे, वेश्वी ग्रामपंचायत कडून एनएमएमटी बस सेवा चालू करण्यास नवी मंबई परिवहन अधिकार्यांनकडे मागणी प्रस्ताव मंगळवार दिनांक ०७ जून २०२२ रोजी दाखल करण्यात आले.वाढत्या इंधन दर वाढीमुळे तसेच सीएनजी दर वाढीमुळे नागरिकांच्या खिशाला कात्री लागली असून पर्यायी मार्ग एनएमएमटी बस सेवा चालू करण्याचे विंधन, दिघोडे, वेश्वी ग्रामपंचायती कडून प्रस्ताव दाखल केल्यामुळे येथील नागरिकांत ग्रामपंचायतीचे कौतुक होत आहे. पुढे बेलापूर रेल्वे स्टेशन वाशी बसस्थानक यांना ही जोडून या सेवेचा लाभ घेता येईल.एनएमएमटी बस सेवेचा फायदा प्रदूषण मुक्तीसाठी तर होणारच आहे त्याच बरोबर नागरिकांनचे प्रवास सुखकर होऊन त्यांच्या पैशांची बचत देखील होईल. इलेक्ट्रिक वातानुकूलित एनएमएमटी चा फायदा गावातील वयोवृद्ध, दिव्यांग, नोकरदार वर्ग, विद्यार्थी सर्वांना होणार आहे.

सदर प्रस्ताव नवी मंबई परिवहन चे वरिष्ठ अधिकारी धर्मराज भगत यांच्या कडे दाखल करण्यात आले असून शिवसेनेचे उरण पूर्व विभाग प्रमुख भूषण ठाकूर, भारतीय जनता पार्टी उरण पूर्व विभाग सरचिटणीस रुपेश पाटील, माथाडी कामगार संघटनेचे कार्यकर्ते शरद शेळके, तसेच दत्ता चौहान यांच्या माध्यमातून दाखल करण्यात आले.

# अभिनवच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह संमेलन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जागतिक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधून अभिनव ज्ञान मंदिर शाळेच्या १९८२ च्या १० वी च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले होते.४० वर्षांनी मित्र मैत्रिणी एकमेकांना भेटले.

कर्जत तालुक्यातील वदप येथील मिलिंद फार्म हाऊस वर स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी श्रीगणेश पूजन करण्यात आले त्यानंतर शाळेचे माजी मुख्याध्यापक श्रीकृष्ण करमरकर, सविता मुजुमदार,अनिल गडकरी व ८२ चे वर्गमित्र विनोद ओसवाल, अनिल पाटील तसेच इतर वर्ग मित्र मैत्रीणीचे नातेवाईक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. दिनेश अडावदकर यांनी ८२ च्या बॅच ने आतापर्यंत केलेल्या उपक्रमांबदल माहिती दिली. वर्षा देसाई हिने पुढील उपक्रम संबंधित माहिती दिली.

नंतर प्रत्येकाने आपली ओळख करून दिली त्यानंतर गाणी व मनोरंजनाचे कार्यक्रम झाले. दुपारी सत्रात पारस जैन, वर्षा रणदिवे, मीना कुलकर्णी, संध्या भागवत आणि सीमा जाखडी यांनी सामुहिक मनोरंजक खेळ घेतले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सर्वांच्या सोबतीने अनेक कामे मार्गी : रामशेठ ठाकूर

सदस्य सागर ठाकूर, कोळी समाज अध्यक्ष विश्वनाथ कोळी, रयत शिक्षण संस्थेचे लाइफ मेंबर प्रमोद कोळी, शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक हाडकु कोळी, अध्यक्ष अशोक कोळी, उपाध्यक्ष सचिन कोळी, सेक्रेटरी कांचन कोळी, खजिनदार जनार्दन कोळी, यांच्यासह यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्यात कोरोनाने पुन्हा वेग पकडला; नव्या व्हेरिएंटचाही रुग्ण आढळला

बीए.१ आणि बीए.२ हे विषाणुंचे प्रमाण अधिक होते. हे दोन्ही उपप्रकार आधी भारतात आढळून आले होते. मात्र, आता त्यामध्ये आणखी उत्परिवर्तन झाले असून त्यापासून बी ए. ४ आणि बीए. ५ त्यामध्ये हे दोन्ही विषाणुप्रकार तयार झाले असून ते अधिक संसर्गजन्य आहेत. या नव्या व्हेरिएंटमुळे दक्षिण अफ्रिकेत पाचवी लाट आली आहे.

काही ठिकाणचा पॉझिटिव्हिटी रेट ५ ते ८ टक्क्यांपर्यंत गेला आहे. ही आकडेवारी काळजी वाढवणारी आहे. या सर्व जिल्ह्यांमधील चाचण्यांची संख्या वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये दर १०० चाचण्यांमागे ६ ते ८ टक्के पॉझिटिव्ह येत असले तरी रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण चार टक्के आहे. यामध्ये गंभीर रुग्णांची संख्या नाही. त्यामुळे काळजीचे कारण नाही. पण या सहा जिल्ह्यांत कोरोना चाचण्या कठोरपणे वाढवण्याच्या सूचना केंद्र सरकारनेही दिल्या असे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

राज्यात मास्कसक्तीचा निर्णय झालेला नाही. पण लोकांनी स्वत:हून मास्क घालावे. लोकांनी स्वत:च्या सुरक्षेसाठी मास्क घालावा. मास्क घातला नाही म्हणून कारवाई होणार नाही. दंड आकारला जाणार नाही. तसेच लसीचे दोन डोस घेतलेल्यांनी बूस्टर डोस घ्यावेत. दुसऱ्या डोसनंतर नऊ महिने झाले असतील तर बूस्टर डोस घ्यायला हवा, असंही टोपे म्हणाले.

## आंदोलकांवरील इतर गुन्हे शासन मागे घेणार : उपमुख्यमंत्री

अनूप कुमार, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, प्रधान सचिव दिनेश वाघमारे, जे. पी. गुप्ता, किसान क्रांती संघटनेचे प्रतिनिधी सरपंच डॉ. धनंजय धनवटे, सुभाषराव कुलकर्णी, सुहासराव वहाडणे, सुभाष वहाडणे, संगीता भोरकडे, ड. विजय सदाफळ, ॲड. चांगदेव धनवटे, धनंजय जाधव, बाळासाहेब चव्हाण, नामदेव धनवटे, विठ्ठलराव जाधव, ड मुरलीधर थोरात, अनिल नळे, योगेश रायते, अमोल सराळकर, दत्तात्रय धनवटे, बाळासाहेब भोरकडे, निकिता जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. साखर आयुक्त शेखर गायकवाड, अहमदनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले हे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शेतकरी जगला तर राज्य जगेल हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय राज्यशासनाने घेतले आहेत. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा मोठा निर्णय घेण्यात आला. शेतकरी समाधानी होण्यासाठी, शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. गळीत हंगाम २०२१-२०२२ मधील अतिरिक्त ऊसाचे गाळप करण्यासाठी वाहतूक अनुदान व साखर घट उतारा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतक-यांना ईथेनॉल निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदा राज्यात ऊसाचे विक्रमी उत्पादन व गाळप झाले असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक राहू नये यासाठी शासनाने सर्वतोपरी उपाययोजना केल्या आहेत. यंदाच्या गाळप हंगामात ऊस शिल्लक राहणार नाही. याउपरही जर ऊस शिल्लक राहिला तर शिल्लक ऊसाला भरपाई देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

दुग्धविकास विभागामार्फत दूध उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. कोरोना संकटाच्या काळातही दूध व्यवसायाला मदत करण्यात आली. दूध उत्पादन वाढीसाठी देशी गाईंच्या जातींवर विशेषत्वाने लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. दुधाला एफआरपी देण्यासंदर्भातील प्रस्ताव संबंधीत समितीसमोर ठेऊन अभ्यासाअंती त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. कांदाचाळी आणि कोल्ड स्टोअरेजच्या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सुविधा देण्यात येत आहेत. कांदा निर्यातीवरील बंदीसंदर्भात ठराव करून तो केंद्रसरकारकडे सादर करण्यात येईल. शेतकऱ्यांना सौरऊर्जा पंपाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी योजनांबरोबरच संशोधनाला चालना देऊन कृषिविकास साधण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

बैठकीत महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, कृषीमंत्री दादाजी भुसे, दुग्धव्यवसाय विकासमंत्री सुनील केदार, सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनीही संबंधीत विभागामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड ,**
**निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड , जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, हे खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ऑफलाईन पध्दतीने मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव (२४०२ विस्तार व सुधारणा ) | निविदेची अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | तळेखार खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. १२० मी. ते ६०० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना. | ८,१७,०६१/- |
| २ | चोळे खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. ८०० मी. ते ९२० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना | ८,०६,७५३/- |
| ३ | कोकेरी खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. ६०० मी. ते ७३० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना | ८,२८,३२४/- |
| ४ | आवरे खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. ११०० मी. ते १२९० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना | ८,४६,५५६/- |
| ५ | खोपटा कोप्रोली खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. ३५०० मी. ते ३६५० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना व सा. क्र. २६३५ मी. वरील उघाडीस पी. पी. जी. एल. दरवाजे बसविणे. | ८,२३,५१०/- |
| ६ | बोरखार खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगडसा. क्र. ६२७० मी. ते ६३९० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना व सा. क्र. १३५६., ६३७२ मी. व ९२९५ मी. वरील उघाडीस लाकडी दरवाजे बसविणे. | ८,४१,५७८/- |
| ७ | बुर्डी खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगड सा. क्र. ७६० मी. वरील उघाडीची सुधारणा करणे. | ७७६२३५/- |
| ८ | मसद खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगड सा. क्र. १९७० मी. ते १९८२ मी. मधील बांधाची पुनर्स्थापना व सा. क्र. ५५० मी. वरील उघाडीची सुधारणा करणे. | ७,९८,२०८/- |
| ९ | धोंडपाडा खारभुमी योजना, ता. पेण, जि रायगड सा. क्र. १२० मी. वरील उघाडीचे मजबुतीकरण. | ८,२०,१७१/- |
| १० | धेरंड खारभुमी योजना, ता. अलिबाग, जि रायगड सा. क्र. ३३३० मी. ते ३४५० मी. मधील बांधाची पुनर्स्थापना . | ८,५३,४५५/- |

**निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक १०.०६.२०२२ ते २४.०६.२०२२ संध्याकाळी ५.३० पर्यंत

**कोरे निविदा सादर** :- दि. २७.०६.२०२२ ते २८.०६.२०२२ पर्यंत संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत

**निविदा उघडणे** :- दिनांक २९.०६.२०२२

जिओ टॅगिंगबाबतचे प्राधिकरण पत्र कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी विभागाकडून उपलब्ध करून दिलेल्या ड्रॉप बॉक्समध्ये टाकावे. जिओ टॅगिंग कंत्राटदाराने लिफाफा क्र. 1 मध्ये सादर केले पाहिजे याशिवाय निविदा पुढील कारवाईसाठी वैध राहणार नाही. जिओ टॅगिंगचा कालावधी दि. १३.०६.२०२२ ते १७.०६.२०२२ पर्यंत आहे.

( सु. ह. सावंत)
कार्यकारीअभियंता,
खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग,
पेण-रायगड.

क्र.जिमाका/राअ/जाहि/४५/२०२२-२३

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बहिनीबरोबर बेलापूर स्टेशन येथे आलेली एक महिला तेथून कुठं तरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात कारणात आली आहे.

जागृती दीपक साकळीया ( वय ३२ ) रा. ऐरोली, उंची ५ फूट ५ इंच, अंगाने मजबूत, रंगाने गोरी, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे व लांब, डोळे मोठे असून, हनुवटीवर तीळ आहे तसेच अंगात राखाडी रंगाची साडी व राखाडी रंगाचा ब्लाउज आहे या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे फो. – २७४६७१२२ किंवा सहा . पोलीस उप निरीक्षक आर आर पाटील मोबाईल नंबर ८३५६०४४५३८ येथे संपर्क साधावा

## सिडकोच्या ढिसाळ कारभाराचा अग्नीशमन दलाला फटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोच्या ढिसाळ कारभाराचा फटका कामोठे वसा–हती मध्ये अग्निशमन दलाला बसला आहे .

सेक्टर ९ येथील अनिरुद्ध बिल्डिंग मधून आगीची तक्रार आली असता मदत कार्यासाठी जाणारा अग्निशमन दलाचा बंब सिडकोच्या ओपन ड्रेनेज चेंबर मधे अडकला. कामोठे कॉलोनी फोरम तर्फे सातत्याने पाठपुरावा करुन सुद्धा सिडको सेक्टर ९ मधिल ड्रेनेज समस्ये कडे दुर्लक्ष करत आहे. मदत कार्या साठी जाणारा अग्निशमन दलाचा बंब अडकून बसला असुन मदत कार्यास उशीर होत झाला होता या संदर्भात स्थानिक रहिवाश्यांच्या संताप व्यक्त केला आहे .

# भारतीय रिजर्व बँक, मुंबई तर्फे अलिबाग येथे महिला बचतगटांकरिता मार्गदर्शन आणि आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, भारतीय रिझर्व बँक, मुंबई कार्यालय यांच्या वतीने आणि बँक ऑफ इंडिया, जिल्हा अग्रणी बँक, रायगड यांच्या सहकार्याने हॉटेल होरीजोन, वरसोली, अलिबाग–रेवस रोड येथे काल (दि.०६ जून) रोजी मार्गदर्शन आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचा उद्देश महिला बचतगट तसेच समाजातील इतर घटकांना बचतीचे महत्त्व, व्यवसायाची उभारणी, बँकांमार्फत व्यवसायासाठी लागणारे आर्थिक सहाय्य, मालासाठी तयार करावयाची घरगुती व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, निर्यातीसाठी आवश्यक मार्गदर्शन व उपलब्ध असलेल्या सरकारी योजना, इत्यादी बाबींवर सविस्तार चर्चा आणि मान्यवर व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आले.

प्रादेशिक संचालक, श्री.अजय मिचयारी, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई कार्यालयाच्या महाव्यवस्थापक, श्रीमती कल्पना मोरे, बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर श्री.सुब्रतोकुमार रॉय, बँक ऑफ इंडियाच्या झोनल मॅनेजर, श्रीमती शंपा बिस्वास, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक श्री.प्रदीप अपसुंदे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानचे जिल्हा व्यवस्थापक श्री.सिद्धेश राऊळ, जिल्हा कृषी अधीक्षक श्रीमती उज्वला बाणखेले, बँक ऑफ इंडियाचे जिल्हा अग्रणी व्यवस्थापक श्री.विजय कुलकर्णी, लीड डिस्ट्रिक्ट ऑफिसर श्री.नरेंद्र कोकरे अशा मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.




या कार्यक्रमाचा उद्देश महिला बचतगटांना ऑनलाईन मार्केटिंग या माध्यमाची ओळख करून देणे तसेच ऑनलाईन मार्केटिंग कशी करायची याची रीतसर माहिती देणे हा होता. त्याचबरोबर आपला पदार्थ कशाप्रकारे बाजारात आणावा व त्याची पॅकिंग आणि ऑनलाईन डिलिव्हरी कशी करायची, याबद्दलही महिलांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. श्री.समरेश साहा यांनी गूगल या संकेतस्थळावर आपली नोंद करून मध्ये व्यवसाय करण्यासाठीचे आवश्यक मार्गदर्शन केले. भारतीय रिजर्व बँकेच्या महाव्यवस्थापक श्रीमती कल्पना मोरे यांनी समाजातील विविध घटकांना बँकिंग सेवेचा लाभ मिळावा याबाबत त्यांचे कर्तव्य व अधिकार याची माहिती करून दिली. श्रीमती कल्पना मोरे यांनी महिलांनी पारंपरिक पदार्थ बनवत न राहाता वेगळा दृष्टिकोन आत्मसात करावा तसेच पॅकिंग आणि मार्केटिंगकडे लक्ष देऊन आपली प्रगती करावी, असे आवाहन केले.

भारतीय रिजर्व बँकेचे प्रादेशिक संचालक श्री.अजय मिचयारी यांनी भारतीय रिजर्व बँकेतर्फे राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती देऊन महिला सक्षमीकरणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली व प्रत्येक महिलेने या योजनांचा व्यवस्थित लाभ घेवून स्वतःची प्रगती साधण्याचे आवाहन केले. अलिबागला समुद्र, सह्याद्रीच्या डोंगर रांगा आणि सुपीक जमीन हे दैवी वरदान लाभलं आहे. आपण आपली इच्छाशक्ती व्यवस्थितपणे वापरली तर तुम्ही बऱ्याच चांगल्या गोष्टी करुन देशाच्या प्रगतीला हातभार लावू शकता, असे सांगून त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी महिलांचे योगदान आणि त्यांना शासनामार्फत मिळणाऱ्या योजनांबद्दलची माहिती दिली.

श्री.राहुल जोशी, यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न खाद्य प्रक्रिया योजनेंतर्गत महिला बचतगटांना पॅकिंगचे महत्व सांगून त्यांना आपल्या पदार्थाला योग्य भाव मिळविण्यासाठी लागणारे तंत्र आणि तांत्रिक माहिती याबद्दल अवगत केले. श्री.प्रदिप अपसुंदे यांनी नवीन उद्योजकांना नाबार्डतर्फे व शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ घेण्याचे सुचविले. तसेच त्यांनी नाबार्डच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. श्रीमती उज्वला बाणखेले यांनी उपस्थितांना कृषी योजनांची माहिती देवून त्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

बँक ऑफ इंडिया चे जनरल मॅनेजर श्री.सुब्रतोकुमार रॉय यांनी बँक ऑफ इंडियातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली व येणाऱ्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या योजनांचीही माहिती दिली. विशेष म्हणजे दि.३० जून २०२२ पर्यंत प्रलंबित असलेले सर्व महिला बचतगटांचे कर्ज मंजूरी प्रकरणे तातडीने मंजूर केले जातील, असे जाहीर केले.

बँक ऑफ इंडिया च्या झोनल मॅनेजर श्रीमती शंपा बिस्वास यांनी महिलांचे कौतुक करून त्यांना व्यवसायाकडे वळण्याची विनंती केली. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी ठ्इख कहता है या जनजागृती उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षा, सुरक्षित बँकिंग व्यवहार, डिजिटल बँकिंग ला प्राधान्य, स्वच्छ चलन धोरण तसेच चलनाचा मान कसा राखावा, याचे मार्गदर्शन, बँकिंग लोकपालांची कार्यप्रणाली बँक खातेदाराचे अधिकार इत्यादी बाबींवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी श्री.अमोल कापसे संचालित नमन नृत्य संस्थेच्यावतीने कोळीगीत नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. श्री.नरेंद्र कोकरे यांनी आभार प्रदर्शन केले.

## शिवराज्याभिषेक दिना निमित्त वृक्ष बँक नावाची नवीन संकल्पना

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवराज्याभिषेक दिना निमित्त वृक्ष बँक नावाची नवीन संकल्पना उरण मध्ये प्रथमच अस्तित्वात आली आहे. सुजाता अनिल पारवे(जसखार) आणि अंजली किरण तांडेल(करळ) यांच्या हस्ते या वृक्षारोपणाच्या संकल्पनेच्या नाम फलकांचे अनावरण झाले.नवघर गावातील सामाजिक कार्यकर्ते कु.महेश सुरेश पाटील यांच्या वतीने ही अनोखी संकल्पना राबविली जात आहे.या संकल्पनेच्या माध्यमाने वृक्षारोपणाची आवड असणाऱ्यांना वृक्ष मोफत देण्याच्या उद्देशाने वृक्ष संकलित केले जाणार आहेत .तसेच ज्यांना वृक्षारोपणाची आवड आहे पण सवड नाही असे सर्व वृक्षप्रेमी आमच्या कडे रोप (वृक्ष) जमा (डिपॉजीट) करू शकतात आणि त्या रोपांच आम्ही आमच्या वतीने वृक्षारोपण करू तसेच जी वृक्ष आमच्याकडे जमा असतील तेच वृक्ष मोफत दिली जातील.असे महेश पाटील यांनी यावेळी सांगितले.अश्या प्रकारे आपण आपली वृक्षारोपणाची आवड जपू शकता ! चला वृक्षारोपनासाठी एकत्र येऊया असे आवाहन महेश यांनी यावेळी केले.विठ्ठल मंदिर नवघर, तालुका उरण येथे हि वृक्ष बँक कार्यरत आहे.येथे वृक्षारोपण करण्यासाठी नागरिकांना मोफत वृक्ष मिळणार आहेत.यावेळी नवघर गावातील सामाजिक कार्यकर्ते एम डी भोईर, नितेश पाटील,हर्षल दीपक भोईर, दक्षता अनिल पारवे, दर्श किरन तांडेल ,हेमंत बंडा व मित्र परिवार उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचा माथेरानच्या राजकारण्यांना विसर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या दिनांक ६ जुनला राज्यभिषेक सोहळ्याचा कार्यक्रम रायगड किल्यावर आणि महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. परंतु माथेरान मधील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला येथील कोणत्याही राजकीय नेत्यांना किंवा लोकप्रतिनिधी यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यासाठी वेळ मिळाला नाही.

एरवी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राजकारण केले जाते. शिवजयंती आणि अन्य काही ठराविक कार्यक्रम आयोजित करण्यात आले की यांना आठवण येते. मग त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने जयघोष केला जातो. शिवप्रेमी असल्याचा पोकळ आभास निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जातो परंतु याना छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाची साधी आठवण सुद्धा होऊ शकत नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे.असे मत माथेरान मधील सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी व्यक्त केले आहे. जनार्दन पार्टे हे स्वतः शिवभक्त असून त्यांनी सायंकाळी सात वाजता आपल्या कामातून वेळ काढून छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे भेट दिली असता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पहार नाही हे दृष्य पाहून त्यांचे मन हेलावले आणि सोशल मीडियावर याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

## जेएनपीटी बंदरात पर्यावरण दिन उत्साहात साजरा ; वृक्षारोपण, पर्यावरण शपथसह विविध कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे बंदर अर्थात जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) येथे जागतिक पर्यावरण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पोर्टचे अध्यक्ष संजय सेठी, यांनी जेएनपीए प्रशासन भवन येथे सतत हवा गुणवत्ता मॉनिटरिंग स्टेशन डिस्प्ले बोर्डचे उद्घाटन केले. याप्रसंगी, उपाध्यक्ष श्री उन्मेष शरद वाघ, सर्व विभागाध्यक्ष उपस्थित होते. जागतिक पार्यवारण दिनानिमित्त जेएनपीए एसईझेड येथे वृक्षारोपण कार्यक्रमासह इतर अनेक उपक्रम सुरू करण्यात आले.



केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्री श्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते जेएनपीएने नुकताच आपला पहिला शाश्वतता अहवाल देखील प्रसिद्ध केला आहे, ज्याच्यातून पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासासाठी जेएनपीए करीत असलेले प्रयत्न प्रदर्शित होतात.यावेळी बोलताना, जजेएनप–ीएचे अध्यक्ष संजय सेठी, यांनी जेएनपीएने पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, जेएन पोर्टने पर्यावरण संरक्षणासाठी अनेक प्रकल्प आणि धोरणे हाती घेतली आहेत.

आमच्यासाठी हा खूप अभिमानाचा क्षण आहे; पर्यावरणाबाबत जागरूक बंदर म्हणून आमचे प्रयत्न आणि वचनबद्धता दर्शविण्यासाठी आम्ही २०२० – २०२१ या आर्थिक वर्षासाठी आमचा पहिला शाश्वतता अहवाल प्रसिद्ध केला आहे. आम्ही आमचा प्रत्येक विकासात्मक प्रकल्प राबवित असताना याची खात्री करतो की तो शाश्वत माध्यमांद्वारे आणि पर्यावरणाच्या समतोल विचारात घेऊन विकसित केला गेला आहे. यावेळी बोलताना त्यांनी असंही सांगितलं की कार्बन फूटप्रिंट्स शक्य तितक्या कमी करणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. जेएनपीए मध्ये 'फक्त एक पृथ्वी' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. जेएनपीएने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि बंदर परिसरात आणि आसपासच्या विविध वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण करण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना 'पर्यावरण शपथ' दिली. यावेळी जेएनपीए कर्मचार्यांनी 'फक्त एक पृथ्वी' संकल्पनेवर पथनाट्यही सादर केले, पथनाट्याच्या माध्यमातून छोट्या छोट्या उपायांद्वारे वसुंधरचे रक्षण करण्याविषयी जनजागृती करण्यात आली.

## तरुणांच्या गळ्यातील ७० हजाराची सोनसाखळी केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका तरुणाला कोविड सर्व्हेचे काम मिळवून देण्याच्या बहाण्याने त्याच्या गळ्यातील ७० हजार किमतीची सोनसाखळी लंपास केल्याची घटना पनवेल शहरातील मिरची गल्लीत घडली आहे. केशव सोनवणे असे या तरुणाचा नाव असून तो शिक्षण घेत आहे दरम्यान एकाने त्याला कोविड सर्व्हेचे काम करण्याबाबत विचारणा केली या कामाला त्याने तयारी दर्शविल्या नंतर सदर इसमाने त्याला दुचाकीवरून शहरातील मिरची गल्ली येथे नेले व त्या ठिकाणी चोरी झाल्याचे सांगून त्याच्या गळ्यातील सोनसखळी काढण्यास सांगितले आणि त्याला बोलण्यात गुंतवून ती सोनसाखळी लंपास केली.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that on behalf that my Clients 1) Mrs. Nirmala Avadhesh Yadav and 2) Mr. Avadesh Kumar Yadav purchased Flat No.1101, A-Wing, on 11th Floor, "E.V. Emarald Heights CHS Ltd.", Plot No.14,15,16 & 17, Sector-15, Kalamboli, Navi Mumbai-410218 and in the chain of documents of said property the following documents had been misplaced. 1] Agreement for Sale executed between the Developer M/s. E. V Homes and the Purchaser Mr. Satish Kumar, as per the Agreement for Sale dated 31/12/2010, having Reg. No. PVL-2-54/2011, dated 04/01/2011 and 2] Sale Deed executed between the Seller Mr. Satish Kumar and the Purchasers 1) Mr. Sumir Kumar Talukdar Singh & 2) Mrs. Rekha Sumir Kumar Singh, on 21.12.2015, having Reg. No. PVL-4/16227/2015, dated 21/12/2015, had been Misplace/ Lost while travelling in Kalamboli.

Any Persons, Bank, Financial Institution, Company/Firm having any claim in the said agreement/ properties or any part thereof are hereby required to make the same known to the undersigned at office address given herein below, along with certified copy of the documents pertaining to the claim, within 14 days hereof otherwise any claim arise after the said period, shall be deemed to be waived or abandoned

Place : Kamothe

Date : 07/06/2022

**Sd/-**
**Adv. Deepa Biju**
**Shop No.02, Kohinoor Paradise CHS Ltd., Plot No.53, Sector-12, Kamothe, Navi Mumbai-410206**



**जाहीर नोटीस**

या नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल डॉ. साजिद बजनूर खान रा.खारघर, ता.पनवेल यांना खालील वर्णनाची जमीन खरेदी करावयाची आहे.

| ७/१२ प्रमाणे जमीन मालकाचे नाव | गावाचे नाव | गट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दिनकर कचऱ्या पाटील | तुर्भे ता.पनवेल | ५०/१/अ/२/ब | ०–६८–७० पैकी ०–२८–७० | ६.४६ |

तरी कोणीही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा अधिक संस्थांचे सदर जमीन मिळकती संबंधात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निम सरकारी, कंपनी बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क किंवा इतर कोणताही हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी हरकती कागदपत्रासह माझे खालील पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर शेत जमीन खरेदीखताने आमचे अशिलांचे नावे हस्तांतर करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

पनवेल

दि.०५/०६/२०२२

**सही/–**
**ॲड.किशोर एम. केंडे**
**वकील उच्च न्यायालया**
**३ श्रावण सोसा., सेक्टर १२, नवीन पनवेल–४१०२०६**



अर्जदाराचे वकील
ॲड.श्री.एम.एम.मोकल

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०६/२०२२

कै.शाम शंकर काठे (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.सरिता शाम काठे, वय : ७८, धंदा : शेती
२) श्री.मोहन शाम काठे, वय : ५३, धंदा : नोकरी
३) श्री.आनंद शाम काठे, वय : ४८, धंदा : नोकरी
४) श्री.महेश शाम काठे, वय : ५०, धंदा : नोकरी
सर्व रा.सक्सेरिया, गोविंद बाग, राधाकुंज बिल्डींगचे मागे,
निवेतीया रोड, मालाड (पु), मुंबई ९७ — अर्जदार

तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे कै.शाम शंकर काठे यांच्या सामाईक मालकी व ताबा वहिवाटीच्या जि.रायगड (पूर्वीचा कुलाबा), ता.उरण, मौजे : नागांव हद्दीत स.नं./हि.नं. ९४/१४, ४२/१ व अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडील यांचे मालकीचे ता.उरण ग्रामपंचायत नागांव घर नं.१३९ अ व १३९ ब चे घर वर्णनाच्या मिककती होत्या व आहेत. त्यांचे पश्चात सर्व मिळकती त्यांची पत्नी व मुले यांचेकडे आलेल्या आहेत.

त्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडील कै. शाम शंकर काठे हे त्यानंतर तारीख ६/३/२०१८ रोजी मयत झाले आहे. अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडील कै.शाम शंकर काठे यांना अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. असा ठराव होवून दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज वर नमूद केलेप्रमाणे कोर्टात दाखल केले आहे.

त्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडील कै. शाम शंकर काठे यांना वर नमूद केलेले अर्जदार व्यतिरिक्त कोणी वारस असलेबाबत हरकती असल्यास त्या त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत मे.कोर्टात सादर करावी. अन्यथा मुदतीनंतर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल हे कळावे.

उरण

दि.०७/०६/२०२२

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**



मा.मुन्नाल सो यांचे न्यायालयात
अर्जदारातर्फे वकील ॲड.विक्रम पी. राठोड

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) यांचे कोर्टात, पनवेल

दि.चौ.अर्ज नं.६९५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०७/२०२२

१) श्रीमती.भारती गौतम किरतकर
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
२) गणेश गौतम किरतकर
वय : २७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) निलेश गौतम किरतकर
वय : २४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.वैष्णव सदन, फ्लॅट नं.७, दुसरा मजला,
प्लॉट नं.७ व ९, सेक्टर ११, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ ह्यांचे वडील कै.गौतम भिकू किरतकर यांचा मृत्यू दि.२८/१२/२०१९ रोजी किंग एँडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ॲण्ड मेडीकल कॉलेज (के.ई.एम.) परेल, मुंबई येथे झालेला असून त्यांच्या मृत्यू नंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. मयत कै.गौतम भिकू किरतकर ह्यांचे हयातील त्यांनी वैष्णव सदन, फ्लॅट नं.७, दुसरा मजला, प्लॉट नं.७ व ९, सेक्टर ११, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ या इमारतीत खालील वर्णनाची मिळकत दि.२९/१०/२००२ रोजी मे.के. डी.एम. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री.बिद्यासागर सत्यनारायण जोहरी यांच्याकडून ॲग्रीमेंट फॉर सेल करून दुय्यम निबंधक कार्यालय–उरण येथील नोंदणी कार्यालयात दस्त क्र.उरण ०७८४४/२००२ नुसार खरेदी केलेली आहे. सदनिकेचे विस्तृत वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| अपार्टमेंट | प्लॉट नं. | रुम नं. | मजला | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| वैष्णव सदन, फ्लॅट नं.७, दुसरा मजला, प्लॉट नं.७ व ९, सेक्टर ११, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ | ७ व ९ | ७ | २ | ४१.५४ स्क्वे.मीटर |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जदार हे कै.गौतम भिकू किरतकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. याबाबत कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास सदर मे.कोर्ट उक्त अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीस पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत केल्यास त्यांना सदरहू मयताच्या मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ठिकाण पनवेल येथून दि.७/६/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**



Hon'ble Mujawar Court
Applicant Advocate : Shri.Rajiv Kumar Gupta

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL

Civil M.A.No.704/2022
Exh : 8/D
Next Date : 12/07/2022

1) MRS.DILPREET KAUR CHADHA
Age : 27 Yrs, Occupation : House wife
Residing at : Permanent Address Regency Bldg, Rustomjee Complex, Flat No.2C/1303, Rustomjee Irani Marg, J.S.Road, Dahisar West Dahisar, Mumbai-400068
Temporary Address : Siddhivinayak Tower, Flat No.702, Plot No.82, Dreamland Building, Sector-19, Kamothe, Navi Mumbai-410209 — Applicants

V/S

1) MRS.RAJINDER KAUR
Age : 62 Yrs, Occupation : House wife
Residing at : Siddhivinayak Tower, Flat No.702, Plot No.82, Dreamland Building, Sector-19, Kamothe, Navi Mumbai-410209 — Defendants

WHEREAS the above named Application have filed the application for Succession Certificate of deceased LATE.HARVINDER SINGH, who died on 26/07/2021 on at Dubai (UAE). in respect of her share in the properly mentioned herein under in schedule standing in the name of Deceased as co-sharer / holder with others which described as under.

**SCHEDULE OF PROPERTY**

**AIA Singapore Private Limited's Group Term Life and Group Hospitalization and Surgical policy and AIG Asia Pacific Insurance Pte. Ltd.'s Group Business Travel Policy a sum of SGD 404,724.45 (Sum) (INR. 2 Crore Approx)**

WHEREAS if any person has any Objection, Titles, Claims, Share etc. in the property herein under mentioned then they may appear in person or through their Advocates, objecting this application. If no one appears and objects for the same within 30 days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon.

Given under my hand and seal of this Court on this 7/6/22

Sd/- Jr.Clerk Civil Court, Panvel S.D. — Court Seal — Sd/- Asst.Superitent. Civil Court, Panvel S.D.

